# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई (जि. बीड) येथील सन-२०१६ च्या रद्द झालेल्या व निकृष्ट दर्जाच्या रस्ते कामाचे अदा केलेले देयक वसूल करणेबाबत

**(१) ४३०२९ (०९-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, (जि.बीड) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे या योजनेअंतर्गत सन-२०१६ मध्ये १ कोटी ८ लक्ष रुपयांचे काम मंजूर झाले असून सदर कामाची निविदा १७/% या कमी दराने मे. एस बी देशमुख, दत्त मंदिर, देवपुर, धुळे या एजन्सीला देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्ज्याचे होत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दि. १८ एप्रिल, २०१७, ९ मे, २०१७ व २५ मे, २०१७ रोजी तक्रार दिली होती. त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीचे अभियंता व प्रकल्प अभियंता यांनी सदर कामाची पाहणी केली असून काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याचे अहवालात निदर्शनास आणुन दिले तसेच काम तांत्रिक मानकाप्रमाणे व आदर्श गुणवत्ता धोरणानुसार होत नसल्यामुळे महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे यांनी सदर काम रद्द केल्याचे व कामाचे अनुदान देय होणार नाही असे कळवले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रद्द झालेल्या कामाचे धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार अशासकीय प्रशासकीय मंडळाला नसताना बाजार समितीच्या अशासकीय प्रशासकीय मंडळाने, विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, व संबंधित कंत्राटदार याने संगनमत करुन आपल्या सोयीचा अहवाल देऊन सदर रद्द झालेल्या कामाचे ३६,३९,०३९/-देयक चार वर्षानंतर बाजार समितीच्या निधीतून अदा करून मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा अहवाल दिला असून सदर काम महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे यांनी रद्द केले असल्याने नियमबाह्य पद्धतीने बाजार समितीच्या निधीतून देण्यात आलेले देयक तातडीने वसूल करून संबंधित दोषीवर गुन्हे दाखल करण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार व पणन मंत्री यांना दिनांक ११, १३ व १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून बाजार समितीच्या निधीतून देण्यात आलेले देयक वसूल करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२३) :**(१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत बाजार समितीच्या पायाभूत सुविधेच्या विकास करण्यासाठी बाजार समितीस ५० टक्के अनुदानावर विकास कामे करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई, जि. बीड या बाजार समितीची निवड झालेली होती. त्यानुसार बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य , पुणे यांची मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबवली होती व मे. एस. बी. देशमुख, देवपुर, धुळे या कंत्राटदारास काम देण्यात आले होते.

(२) श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या अर्जान्वये बाजार समितीच्या मार्केट यार्डात चालू असलेले रोडचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याने सदर काम रद्द न केल्यास आमरण उपोषण करणेबाबत तक्रार अर्ज केलेला होता. त्यानुषंगाने नोडल अधिकारी पीआययू (कृषि पणन) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे यांनी

प्रकल्पाच्या आदर्श गुणवत्ता धोरणानूसार व आवश्यक तांत्रिक मानकाप्रमाणे काम न झाल्यामुळे आणि तक्रार अर्जाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने कोणताही खुलासा सादर न केल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांची निवड रद्द करुन बाजार समितीस कोणतेही अनुदान देय होणार नाही, असे दिनांक २४.१०.२०१८ रोजी कळविले होते.

(३) पणन संचालक, पुणे यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दिनांक८.०६.२०२० रोजी कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग -१ सहकारी संस्था, बीड यांचेंमार्फत चौकशी करण्यात आली. सदर रस्ता कामाचे मुल्याकंनाप्रमाणे रु.३६,३९,०३९/- एवढी रक्कम कंत्राटदारास अदा करण्याची शिफारस केली. त्यानुसार पणन संचालक यांनी दि.२६.७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये अटींच्या अधीन राहून कंत्राटदारास देयक अदा करण्यास परवानगी दिली.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०९.१०.२०२१ रोजीच्या निवेदनान्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांचेकडे बाजार समितीने रद्द केलेल्या रस्त्याच्या कामाचे बिल अदा करुन भ्रष्टाचार केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २६ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन सदर रस्ता कामाचे देयक अदा केलेले असल्याने बाजार समितीस देयकाची रक्कम रु. ३६,३६,०३९/- हि संबंधीताकडून वसूल करुन बाजार समितीच्या बँक खात्यात ७ दिवसाच्या आत जमा करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी दि.३०.१०.२०२१ अन्वये दिले आहेत. बाजार समितीने सदर आदेशाविरोधात तत्कालीन मा. मंत्री (पणन) यांचेकडे अपील दाखल केले असून त्यास दि.११.११.२०२१ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिलेली आहे.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत सहाय्यक आयुक्त पदाच्या भरतीबाबत

**(२) ४३०४० (१८-०४-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत सहाय्यक आयुक्त पदाकरीता दिनांक २४ जून, २०२१ रोजीच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून जाहिरात ज्ञापन प्रसिद्ध करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जाहिरातीन्वये घोषित करण्यात आलेल्या १६ रिक्त पदांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी २ जागा असताना आर्थिक दुर्बल घटकांसाठी असणारी ५ वर्षे वयोमर्यादेची अट जाहिरातीत नमूद न केल्याने ४० ते ४५ वयोगटातील उमेदवारांना/अधिका-यांना सदरहू परीक्षेस बसण्यापासून वंचित व्हावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दि.३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या संबंधीत परीक्षेमध्ये जवळपास ४३ प्रश्नांबाबत उमेदवारांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे आक्षेप नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००८, २०११ व २०१७ च्या सदरहू पदाच्या प्रश्नपत्रिका व २०२१ मध्ये घेतलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये मोठी तफावत आढळून आल्याने तसेच दुर्बल घटकांना परीक्षेत बसता न आल्याने ६ महिन्यांचा कालावधी देऊन संबंधीत परीक्षा पुन्हा घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) शासन आदेशानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना वयोमर्यादेतील सवलत देण्यात आली आहे, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

तसेच, खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण लागू करण्यात आले असल्यामुळे खुल्या प्रवर्गासाठी असलेले सेवाप्रवेश नियम आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त या पदाकरिता दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत संबंधित उमेदवारांनी ६४ प्रश्नांबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे आक्षेप नोंदविले आहेत, असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.
(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यनियमावलीमध्ये नियम ७-ब व नियम १८ मध्ये आयोगाला आक्षेपार्ह प्रश्न रद्द करण्यासंदर्भात अधिकार आहेत. त्यानुसार सदर पदाच्या परीक्षेची अंतिम उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात आली आहे. याबाबत काही उमेदवारांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका मा. न्यायालयाने आयोगाकडून करण्यात आलेली कार्यवाही योग्य ठरवून खारीज केली आहे, असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.

---

## बीड जिल्ह्यात अभिन्यास (लेआऊट) अंतिम मंजुरी न घेता खरेदी विक्री होत असल्याबाबत

**(३) ४३२६७ (२७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील नगररचना कार्यालयामार्फत अभिन्यास (लेआऊट) केल्यानंतर रेखांकन केले जाते व त्यास अंतिम मंजुरी घेणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी बीड जिल्ह्यात अंतिम मंजुरी घेतली जात नसून त्यास उपजिल्हाधिकारी / तहसीलदार कार्यालयामार्फत अकृषी परवानगी दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील दुय्यम निबंधक ही अभिन्यास (लेआऊट) अंतिम मंजुरी नसताना खरेदी विक्रीच्या नोंदी घेतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तावित अभिन्यासावरच अकृषी केले जाते व अंतिम मंजुरीच घेतली जात नसून अंतिम मंजुरी का घेतली गेली नाही हे देखील पाहिले पाहिजे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अभिन्यास मंजूर झाल्यानंतर रस्ते व मोकळया जागा शहरी भागात नगरपालिकाकडे हस्तांतरित केले जातात व ग्रामीण भागात तहसील कार्यालयाकडे हस्तांतरित करावे लागतात, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, बीड जिल्ह्यात रस्ते व मोकळया जागा हस्तांतरितच केल्या जात नसल्यामुळे तेथे गैरव्यवहार केले जात असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उक्त प्रकरणी चौकशी करुन कार्यवाहीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१२-२०२२) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे, अंतिम अभिन्यास सादर करण्याच्या अटीवर परवानगी दिली जाते.
(३) अंबाजोगाई तालुक्यात अशी बाब निदर्शनास आली आहे.
(४) अकृषक परवानगी देताना, अंतिम अभिन्यास सादर करण्याच्या अटीवर परवानगी दिली जाते.
(५) अभिन्यास मंजूर झाल्यानंतर तर UDCPR मधील विनियम क्र.३.३.११ नुसार रस्ते संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरित केल्या जातात.

UDCPR मधील विनियम क्र.३.४.२ नुसार विकास परवानगी मंजूर झाल्यानंतर मोकळया जागा रहिवाशी / भोगवटादार यांच्या संस्थांकडे आपोआप निहीत होतात.
(६) होय. स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत शासनास विविध निवेदने सादर केली आहेत.
(७) मा. विधानसभा सदस्य यांच्या, अभिन्यासास अंतिम मंजूरी घेतली जात नसल्याबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधित नगर रचना कार्यालय तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, बीड यांना उचित कार्यवाही करण्यास कळविले आहे. तसेच प्रस्तावित अभिन्यासावर Layout Recommended for Demarcation चा शिक्का

मारला जात नसल्याबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधित नगर रचना कार्यालय, जिल्हा प्रशासन अधिकारी, तहसिलदार, नियोजन अधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत. तसेच सहायक संचालक, नगर रचना, बीड शाखा, बीड यांनी सक्षम प्राधिकरणास यथायोग्य कार्यवाही करण्यास कळविले आहे.

---

**गार्डन फॅक्टरी सिध्दार्थनगर ते पश्चिम दुतगती महामार्ग (बोरिवली पूर्व) येथील विकास नियोजन आराखडयातील प्रस्तावित डिपी रस्ता विकसित करण्याबाबत**

**(४) ४३४७५ (३०-०३-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गार्डन फॅक्टरी सिध्दार्थनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग बोरिवली पूर्व येथील विकास नियोजन आराखडयातील प्रस्तावित डिपी रस्त्यांची जमिन भूसंपादित करुन रस्ता विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे मागाठाणे, ता. बोरीवली येथील सिध्दार्थ नगर ते टाटा पॉवर येथील ३६.६० मी. व १८.३० मी. रुंद विकास नियोजन रस्त्यात बाधीत भूखंडाच्या भूसंपादनाचा प्रस्ताव प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई (जि. बीड) येथील (MACP), पुणे अंतर्गत मंजूर झालेल्या रस्ते कामाबाबत**

**(५) ४३५०३ (०९-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि उत्पन्न बाजार समिती (अंबाजोगाई, जि. बीड.) येथील महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे. अंतर्गत २०१६ साली १०,०८,२२,१४ (एक कोटी आठ लाख बावीस हजार चौदा) रुपयांचे रस्त्याचे काम मंजुर झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिमेंट रस्ता कॉक्रीटीकरण चे काम निकृष्ठ झाल्याबाबत श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी तक्रार केली होती, तसेच बाजार समितीचे सल्लागार अभियंता व प्रकल्प अभियंता यांनी काम चालू असतांना कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत अहवाल दिल्याने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे यांनी सदर काम रद्द केले होते, त्यानंतर चार वर्षांनी त्याच सल्लागार अभियंता यांनी त्या कामाचे मुल्यांकन केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, बीड हे तांत्रिक अधिकारी नसतांना त्यांनी चौकशी करुन चार वर्षानंतर प्रशासकीय मंडळ व संबंधित कंत्राटदार यांच्या संगनमताने कंत्राटदाराच्या सोयीचा अहवाल देऊन सदर रद्द झालेल्या कामाचे देयके अदा करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांची उच्चस्तरीय अधिकारी/जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे सहकार व पणन मंत्री यांच्याकडे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२३) :** (१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत बाजार समितीच्या पायाभूत सुविधेच्या विकास करण्यासाठी बाजार समितीस ५० टक्के अनुदानावर विकास कामे करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई, जि. बीड या बाजार समितीची निवड झालेली होती. त्यानुसार बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबवली होती व मे. एस. बी. देशमुख, देवपुर, धुळे या कंत्राटदारास काम देण्यात आले होते.

(२) श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या अर्जान्वये बाजार समितीच्या मार्केट यार्डात चालू असलेले रोडचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याने सदर काम रद्द न केल्यास आमरण उपोषण करणेबाबत तक्रार अर्ज केलेला होता. त्यानुषंगाने नोडल अधिकारी पीआययू (कृषि पणन) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे यांनी प्रकल्पाच्या आदर्श गुणवत्ता धोरणानूसार व आवश्यक तांत्रिक मानकाप्रमाणे काम न झाल्यामुळे आणि तक्रार अर्जाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने कोणताही खुलासा सादर न केल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांची निवड रद्द करुन बाजार समितीस कोणतेही अनुदान देय होणार नाही, असे दिनांक २४.१०.२०१८ रोजी कळविले होते.

(३) पणन संचालक, पुणे यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दिनांक ०८.०६.२०२० रोजी कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, बीड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदर रस्ता कामाचे मुल्यांकनाप्रमाणे रु.३६,३९,०३९/- एवढी रक्कम कंत्राटदारास अदा करण्याची शिफारस केली. त्यानुसार पणन संचालक यांनी दिनांक २६.७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये अटींच्या अधीन राहून कंत्राटदारास देयक अदा करण्यास परवानगी दिली.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०९.१०.२०२१ रोजीच्या निवेदनान्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांचेकडे बाजार समितीने रद्द केलेल्या रस्त्याच्या कामाचे बिल अदा करुन भ्रष्टाचार केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २६ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन सदर रस्ता कामाचे देयक अदा केलेले असल्याने बाजार समितीस देयकाची रक्कम रु. ३६,३६,०३९/- ही संबंधितांकडून वसूल करुन बाजार समितीच्या बँक खात्यात ७ दिवसाच्या आत जमा करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक ३०.१०.२०२१ अन्वये दिले आहेत. बाजार समितीने सदर आदेशाविरोधात तत्कालीन मा. मंत्री (पणन) यांचेकडे अपील दाखल केले असून त्यास दिनांक ११.११.२०२१ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिलेली आहे.

---

## धुळे शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याबाबत

**(६) ४३५१३ (२५-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर हानी झालेली असून ठिकठिकाणी खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून वाहनधारकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत धुळे शहरात मलनि:स्सारण प्रकल्पाचे काम सुरु असून, सदर योजनेतील एकूण १४७ कि.मी. लांबीच्या वाहिनीपैकी एकूण १२६ कि.मी. लांबीचे मलनि:स्सारण वाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. मलनि:स्सारण वाहिनीची मार्गदिशा रस्त्याच्या मध्यातून जात असून काम करतांना रस्त्याचे खोदकाम करावे लागते. त्यामुळे रस्ते खराब होणे ही वस्तुस्थिती आहे.

(२) मलनि:स्सारण वाहिनीचे काम केलेल्या ठिकाणी पाईपलाईनच्या रुंदीएवढे रस्त्याच्या डागडुजीचे काम करण्यात आले आहे/येत आहे.

यात्व्यतिरिक्त महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत धुळे शहरातील एकूण २० रस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु केले आहे.

त्याचप्रमाणे धुळे शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याकामी महानगरपालिकेमार्फत ई-निविदा मागविण्यात आली असून कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथे जिल्हा जातपडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(७) ४३६४५ (०९-०४-२०२२). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात जात पडताळणी समितीकडे गत सहा महिन्यापासून अनेक जातपडताळणी प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकालात काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) व (२) बाबत - हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यात जात पडताळणी समितीकडे माहे जानेवारी, २०२२ अखेर ७२८७ प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळून आले.

शासनस्तरावरुन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडील प्रलंबित प्रकरणांबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. त्या अनुषंगाने दि.१४.०१.२०२२ व दि.२५.०३.२०२२ रोजी आयोजित बैठकींमध्ये प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत निर्देश देण्यात आले.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने जानेवारी, २०२२ अखेर प्रलंबित ७२८७ प्रकरणे व माहे फेब्रुवारी, २०२२ ते जून, २०२२ अखेर प्राप्त झालेली प्रकरणे ५३२६ असे एकूण १२६१३ प्रकरणांपैकी ११३६४ प्रकरणे विशेष मोहिम राबवून निकाली काढण्यात आलेली आहेत. दि.१२.०७.२०२२ पर्यंत समिती स्तरावर प्रलंबित असलेल्या १२५३ प्रकरणापैकी तीन महिन्यातील ७९७ प्रकरणे प्रलंबित आहेत व तीन महिन्यांवरील ४५६ प्रलंबित प्रकरणे आहेत. तीन महिन्यांवरील ४५६ प्रलंबित प्रकरणांपैकी सुनावणीसाठी २०६ प्रकरणे व उर्वरित २५० प्रकरणे अर्जदाराने त्रुटीची पुर्तता न केल्यामुळे प्रलंबित असल्याचे दिसून येते.

दि.३१.०५.२०२२ व दि.१६.०९.२०२२ रोजी आयोजित बैठकीमध्ये प्रलंबित प्रकरणे विहीत मुदतीत निकाली काढण्याबाबत शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील झाडांवर पोस्टर, बॅनर व फलक लावण्यास आळा घालण्याबाबत

**(८) ४३९९९ (२५-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झाडांवर पोस्टर, बॅनर, फलक लावण्याचे प्रकार मोठया प्रमाणात वाढत असल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकार शहर विद्रुप करण्यापर्यंतचा मर्यादित नसून यात झाडाला इजा होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने घेऊन सदरील गैरप्रकाराला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मुंबईतील झाडांवर पोस्टर, बॅनर, फलक लावण्याच्या तक्रारी प्राप्त होताच अथवा नियमित पाहणीदरम्यान झाडांवर कोणत्याही प्रकारचे बॅनर, पोस्टर इत्यादी आढळल्यास ते बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तात्काळ काढण्यात येतात व झाडाला इजा होणार नाही याची काळजी घेतली जाते.

सदर कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमितपणे केली जाते असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या ऑक्सीजन प्लांट उभारण्याच्या कामामध्ये विलंब झाल्याबाबत**

**(९) ४४५४० (३०-१०-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने रु.२६७ कोटींचे १९ पैकी १७ ऑक्सिजन प्लांट वेळेत पूर्ण करण्यात पालिका अधिकारी व कंत्राटदार अपयशी ठरले असून कंत्राटदारांना फक्त ४.०७ कोटींचा शुल्लक दंड आकारला असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त १९ पैकी १२ कामे मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीस तर ७ कामे ही मे. जीएसएन असोसिएटसला देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिल्या टप्प्यात अपयशी ठरलेल्या मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीस काळया यादीत टाकण्याऐवजी महानगरपालिकेने दुसऱ्या टप्प्यात ५९.३६ कोटींचे नवीन कामाचे कार्यादेश दिनांक २७ सप्टेंबर २०२१ रोजी जारी केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मा.मुख्यमंत्री व मा.महापालिका आयुक्त यांना निवेदन दिले असून सदर कामांत कनिष्ठ ते वरिष्ठ अधिकारी यांनी कोणत्या प्रयोजनाने दुर्लक्ष केले याची चौकशी करणे आवश्यक असून तसेच दंड फक्त कंत्राटदार यांस आकारला गेला असून सर्व अधिकारी वर्गाची जबाबदारी निश्चित करत त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती मुंबई महानगरपालिकेच्या ऑक्सीजन प्लांट उभारण्याच्या कामामध्ये विलंब केल्यामुळे कंत्राटदार व महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०२-२०२३) :** (१) मे. जी.एस.एन. असोसिएट्स आणि हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदारांकडून १९ पैकी १७ ऑक्सिजन प्लांटच्या कामात झालेल्या विलंबाबाबत दोघांना मिळून एकूण रु. ४.०७ कोटी इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे.

तथापि, सदर दंड निविदेच्या/कंत्राटाच्या अटी व शर्तींनुसार योग्य प्रकारे आकारण्यात आला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेदरम्यान प्राणवायूच्या कमतरतेचा अभाव पाहता, तिसऱ्या लाटेच्या तयारीसाठी प्राणवायूबाबत सुसज्ज व स्वयंनिर्भर राहणे गरजेचे होते. मात्र त्या तयारीकरिता पुरेसा अवधी नसल्याने पहिल्या निविदेच्या कामादरम्यान दुसऱ्या निविदेची प्रक्रिया पूर्ण करुन सयंत्र उभारणी करणे क्रमप्राप्त होते.

त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या ई-निविदेचे दुसरे काम मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मिळाले होते.

मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी पहिल्या टप्प्यातील काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. मात्र निविदेतील अटींनुसार कार्यपूर्तीच्या विलंबाबाबत निविदेच्या अटी व शर्तींनुसार दंड आकारण्यात आलेला असल्यामुळे त्यांना काळया यादीत समाविष्ट करणे उचित नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संपूर्ण निविदा प्रक्रिया तसेच, कार्यान्वितीकरणाचे काम संपूर्णरित्या पारदर्शी पध्दतीने तसेच महानगरपालिकेच्या नियम व धोरणानुसार वेळोवेळी सर्व प्रशासकीय आवश्यक बाबी पूर्ण करुन पार पाडलेले आहे.

तसेच, उशिरा काम पूर्ण केल्याबद्दल मे. जी.एस.एन. असोसिएट्स आणि हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना निविदेच्या अटी व शर्तींनुसार दंड आकारण्यात आलेला आहे. यास्तव सदर प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुंबईमध्ये मागील ११ वर्षांपासून दरडी कोसळून होणाऱ्या दुर्घटनेवर उपाययोजना करण्याबाबत

**(१०) ४४५४६ (३०-१०-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये मागील ११ वर्षांपासून दरडी कोसळून होणाऱ्या दुर्घटनेवर उपाययोजना करण्यासाठी राज्य शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी देऊन नगरविकास विभागाने अद्यापही त्याची अंमलबजावणी केली असून, संरक्षण भिंतीवर आजमितीला ३०० कोटी रुपये खर्च केले गेले ज्यात सर्वाचे पुर्नवसन करणे शक्य होते, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सर्वसमावेशक सर्वेक्षण करणाऱ्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने राज्य शासनाला केलेल्या शिफारसीनुसार मुंबईतील ३६ पैकी २५ मतदार संघात २५७ ठिकाणी डोंगराळ भागात धोकादायक म्हणून वर्गीकृत असून सदर भागातील २२ हजार ४८३ झोपडपट्ट्यांपैकी ९६५७ झोपडयांना प्राधान्याने स्थानांतरीत करावे तसेच उर्वरीत झोपडयांना टेकडयांच्या आजूबाजूला तटबंदी बनवून संरक्षित करण्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१० मध्ये प्रस्तावित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशानुसार कृती आराखडा तयार करुन कायमस्वरुपी पुर्नवसन करत टेकडया, डोंगर परीसर संरक्षित करण्याची विनंती शासनाकडे दोन वेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, सदर चौकशीअंती मुंबईतील दरडी कोसळून होणारी जीवित आणि वित्तहानी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) व (२) डोंगर उतारावरील ३२७ धोकादायक ठिकाणांवरील २२,४८३ झोपड्यांपैकी किती झोपड्यांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे शक्य आहे व किती झोपड्यांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन करावे लागेल यादृष्टीने माहिती मिळण्यासाठी तज्ञ नगररचनाकार यांच्या मदतीने कृती आराखडा तातडीने तयार करणेबाबत नगर विकास (नगररचना)/झोपडपट्टी पुनर्वसन यांना निदेश दिले होते.

याअनुषंगाने नगर विकास विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नगररचना विषयात तज्ञ अधिकारी कार्यरत असल्याने, बैठकीत ठरल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कृती आराखडा तयार करणेबाबत गृहनिर्माण विभागास कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(५), (६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत दरडी कोसळण्याची संभाव्य ठिकाणे असलेल्या विभागातून प्राप्त माहिती एकत्रित करुन सन २०१७ मध्ये बृहन्मुंबईतील एकूण २९९ ठिकाणांचे शास्त्रीय पध्दतीने सर्वेक्षण करण्याकरिता भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाची मदत घेण्यात आली. सन २०१८ मध्ये भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने २९९ पैकी २४९ संभाव्य दरडी कोसळण्याच्या ठिकाणांचे सखोल व शास्त्रीय पध्दतीने सर्वेक्षण करुन त्यांचे ५ उपप्रकारांमध्ये विभाजन केले. या ५ उपप्रकारांमध्ये ४६ ठिकाणे अतिधोकादायक, २५ ठिकाणे मध्यम धोकादायक, ४० ठिकाणे कमी धोकादायक व १४३ ठिकाणे धोका नसलेली निश्चित करण्यात आली आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत जिल्हाधिकारी उपनगरे यांना १२८६ ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असल्याबाबतची यादी देण्यात आली असून, सदर यादी पडताळून किती ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्यात यावी याची निश्चित करण्याची विनंती भूस्खलन तांत्रिक समितीस करण्यात आली आहे.

सदर समितीची बैठक दिनांक १३.०५.२०२२ रोजी झाली असून, सदर बैठकीत संभाव्य भूस्खलनाच्या ठिकाणी आधीच्या २४ तासात २०० ते २५० मिमी इतक्या पावसाची नोंद झाली असल्यास सुरक्षिततेचा उपाय म्हणून तेथील नागरिकांचे जवळच्या तात्पुरत्या निवाऱ्यात स्थलांतर करणे, संरक्षक भिंत बांधताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, नागरिकांमध्ये करावयाची जनजागृती इत्यादीबाबत निर्देश दिले आहेत.

भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभाग तसेच, भूस्खलन तांत्रिक समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगरे), म्हाडा, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

---

## दक्षिण मुंबईसह मुंबई शहर व उपनगर शहरात वाहन तळातील पार्किंग शुल्कातून नागरीकांची होत असलेली लूट

**(११) ४४६१० (३१-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील 'पे आणि पार्क' ची कंत्राटे चार ते सहा महिन्यांपूर्वी संपल्यानंतरही काही वाहनतळात बेकायदेशीर व अनधिकृतपणे पार्किंग शुल्क वसुली सुरू असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुचाकी पार्किंग करता तासाला २० ते ५० रुपये तर चारचाकी वाहन करता तासाला १५० ते २५० रुपये अनधिकृतरित्या वसूल केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राट संपलेल्या ठिकाणी लावलेले विनामूल्य पार्किंगचे फलक काढून तिथे सशुल्क पार्किंगचे फलक लावण्यात येऊन नागरिकांची बेकायदेशीर लूट करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी अवैध कंत्राटदारांकडून नागरिक व वाहन चालकांची पार्किंग शुल्कासंदर्भातील होत असलेली बेकायदेशीर लूट थांबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०२-२०२३) :** (१) "पार्किंग शुल्कातून लूट" या मथळ्याखाली मुदत संपल्यानंतरही बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली सुरु असल्याची बातमी दिनांक ०६.०४.२०२२ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) वाहनधारकांकडून या स्वरुपाच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिका व गृह विभागाने कळविले आहे.

(३) व (४) कुलाबा येथील गेट वे ऑफ इंडिया येथील पी.जे. रामचंदानी मार्ग व कफ परेड येथील एम.के. रोडवरील "पे ॲण्ड पार्क" ची मुदत ३० जून, २०२२ रोजी संपल्याने सध्या सदर ठिकाणी मोफत पार्किंग आहे. सदर ठिकाणी गस्तीवरील अधिकारी व अंमलदार यांची नियमित गस्त असते. सदर ठिकाणी वाहन धारकांकडून कोणत्याही स्वरुपाचे बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली होत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर "पे ॲण्ड पार्क" ची मुदत माहे मार्च ते जून, २०२२ अशी वाढवून दिली होती. त्यामुळे माहे एप्रिल, २०२२ मध्ये सदर ठिकाणी कायदेशीर "पे ॲण्ड पार्क" अस्तित्वात होते.

तसेच, मरीन ड्राईव्ह वाहतूक विभागातील जमनालाल बजाज मार्ग येथे बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली सुरु असल्याबाबत निदर्शनास आले नाही, असे गृह विभागाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या आरोग्य सेविकांच्या मागण्यांबाबत**

**(१२) ४४६२४ (३१-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या ४ हजाराहून अधिक आरोग्य सेविकांनी किमान वेतन, भविष्य निर्वाह भत्ता, निवृत्ती वेतन, प्रसुती रजा व इतर सेवा शर्ती कामगार कायद्याप्रमाणे द्याव्यात, सेवेत कायम करावे अश्या अनेक मागण्या या पूर्वी वारंवार महानगर पालिकेकडे केल्यानंतर महानगरपालिकेचे त्याकडे दुर्लक्ष व टाळाटाळ होत असल्याने सदरहू प्रलंबित मागण्यांसाठी माहे मार्च, २०२२ मध्ये आंदोलन पुकारले असताना, राज्य शासनाने व महापालिका प्रशासनाने या प्रकरणी तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२२ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार प्रशासनाने त्यासाठी समितीही नेमली व उक्त समितीने आपला अहवाल दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी महापालिका प्रशासनाला सादर केल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी त्यावर कोणताच निर्णय न घेतल्याने दिनांक १ जून, २०२२ पासून पुन्हा बेमुदत आंदोलन पुकारण्याचा इशारा आरोग्य सेविकांच्या संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने सादर केलेल्या अहवालानुसार व आरोग्य सेविकांच्या बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसदर्भात कोणताही निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या ४ हजाराहून अधिक आरोग्य सेविकांच्या मागण्यांसंदर्भात तात्काळ निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामधील महिला आरोग्य स्वयंसेविकांनी विविध मागण्या मान्य होईपर्यंत माहे मार्च, २०२२ मध्ये आंदोलन पुकारले होते, हे खरे आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रकरणी सकारात्मक चर्चा करुन उचित निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन महिला आरोग्य स्वयंसेविकांच्या संघटनेला देण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी तोडगा काढण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी बृहन्मुंबई

महानगरपालिकेस सविस्तर अहवाल सादर केला होता. तथापि, महिला आरोग्य स्वयंसेविकांच्या विविध मागण्या विविध न्यायालयांत न्यायप्रविष्ट असल्यामुळे सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका विधी विभागाचा कायदेशीर सल्ला प्राप्त करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. सदर प्रक्रिया पूर्ण करण्याककरिता थोडा अवधी लागला.

दरम्यानच्या काळात महिला आरोग्य सेविकांच्या संघटनेने दिनांक १ जून, २०२२ पासून पुन्हा बेमुदत आंदोलन पुकारण्याचा इशारा दिला होता, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) महिला आरोग्य सेविकांचे मानधन दिनांक ०१.०६.२०२२ पासून रु. २,०००/- इतके वाढवून ते रु. ११,०००/- इतके करण्यात आले आहे. तसेच, सदर मानधनात दिनांक ०१.०४.२०२३ पासून आणखी रु. १०००/- ची वाढ करुन ते दरमहा रु. १२,०००/- इतके करण्यास मान्यता देण्यात आली आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाच्या कामाबाबत**

**(१३) ४४६३५ (२०-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर दरम्यानच्या समृध्दी महामार्गाचा पहिल्या टप्पा किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(२) असल्यास, सदर मार्गापैकी आतापर्यंत किती कि.मी. लांबीचा रस्ता पूर्ण झाला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन समृध्दी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले नसल्यास त्याची कारणे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२३) :** (१) नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचा (हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) नागपूर ते शिर्डी हा ५२० कि.मी.चा पहिला टप्पा पूर्ण झालेला असून त्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२२ रोजी मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे शुभहस्ते लोकार्पण होऊन तो वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला आहे.

(२) समृध्दी महामार्गामधील ५२० कि.मी. चा पहिला टप्पा पूर्ण झालेला आहे.

(३) समृध्दी महामार्गामधील नागपूर ते शिर्डी दरम्यानचा ५२० कि.मी.चे काम पुर्ण झालेले आहे व सध्या या मार्गावरुन वाहतूक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोनामुळे मृत झालेल्या मृतांच्या वारसांना सानुग्रह अनुदान देण्याचे जाहीर केल्याबाबत**

**(१४) ४४६५२ (१४-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात निधन पावलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एसडीआरएफ) मधून

प्रत्येकी ५० हजार सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय झाला असून देखील १ लाख ८३ हजार रुग्णांच्या नातेवाईकांना अद्याप अनुदान मिळालेले नाही, हे खरे आहे,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून कोरोनामुळे मृत्यु झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना ५० हजार रुपये भरपाई देण्यासाठी माहे डिसेंबर, २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आजपर्यंत शासनाकडे २ लाख ५२ हजार अर्ज भरपाईसाठी प्राप्त झाल्याचे व मा.जिल्हास्तरावर त्यांची छाननी होऊन त्यापैकी १ लाख ७४ हजार अर्जांची छाननी पूर्ण होऊन लाभार्थी नातेवाईकांच्या खात्यावर भरपाई रक्कम जमा देखील करण्यात आल्याचे दि.२१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन मृतांच्या नातेवाईकांना सानुग्रह अनुदान त्वरीत अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) नाही.
(२) होय.
(३) सद्य स्थितीत सानुग्रह सहाय्य मिळणेबाबत ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या एकूण २,६३,१७६ अर्जांपैकी २,०२,७५८ अर्ज मंजूर करण्यात आले असून सानुग्रह अनुदानाची रक्कम अर्जदारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे महापालिकेच्या हद्दीत रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत लाभार्थींना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१५) ४४७७९ (२०-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महानगरपालिकेच्या हद्दीत रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०१७-१८ व २०१८ -१९ या दोन वर्षांत १०४ लाभार्थींना घरकुल मंजूर झाले असून त्यापैकी फक्त ७६ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती योजना आखली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) धुळे महानगरपालिकेमार्फत रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये एकूण ५४ व सन २०१८-१९ मध्ये एकूण ५० याप्रमाणे एकूण १०४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.
वरीलपैकी एकूण ७३ लाभार्थी यांचे घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेले असून १५ लाभार्थी यांचे घरकुलाचे बांधकाम सुरु आहे. तर, १६ लाभार्थी यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता व महानगरपालिकेकडे अनुदानाची मागणी केलेली नसल्याने, त्यांना महानगरपालिकेमार्फत अनुदानाचे वाटप करण्यात आलेले नाही.
(२) महानगरपालिकेमार्फत सदर योजनेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, आयुक्त, समाजकल्याण यांच्यासोबत बैठका आयोजित करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे शहरातील १०५ इमारती धोकादायक झालेल्या असून या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत**

**(१६) ४४७८७ (१०-११-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील १०५ इमारती धोकादायक झालेल्या असून या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण झालेले नसल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबींकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने इमारतीचे संरचनात्मक परीक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) धुळे महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात धुळे शहर व उपनगर मिळून एकूण ११८ धोकादायक इमारती आढळून आल्या आहेत.

(२) सदर ११८ धोकादायक इमारतींपैकी १५ इमारतींचे धोकादायक बांधकाम संबंधित इमारत मालकांनी स्वत:हून पाडले आहे. तर ०६ इमारती कायम बंद करण्यात आलेल्या आहेत.

उर्वरित ९७ इमारतींच्या मालकांना दि.०५/११/२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या असून, उक्त शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) अशा सर्व इमारतींच्या बाबतीत सर्व शहरवासीयांना जागृत करण्यासाठी जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती तसेच सदर इमारती संदर्भात धोकादायक असलेला भाग अथवा संपूर्ण इमारत उतरविण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात आले आहे. सबब, नागरिकांच्या जीवाला धोका पोहचु नये यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुणे महानगरपालिकातील १४ (४) (१) जी चे आरक्षण बदलाचे निर्णय संशयास्पद असल्याबाबत**

**(१७) ४४७९१ (१०-११-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकातील १४ (४) (१) जी चे आरक्षण बदलाचे निर्णय संशयास्पद असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ ते २०२२ दरम्यान पुणे महानगरपालिकेतील १४ (४) (१) जी च्या अधिकारात बदललेल्या आरक्षणांमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याने महानगरपालिकेच्या मोक्याच्या जागा हातून गेल्या असून बहुतांश जागा नाममात्र भाड्याने देऊन खाजगी वापरासाठी वापरण्यात येत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) व (२) नाही.

(३) पुणे महानगरपालिकेच्या तत्कालीन विकास नियंत्रण नियमावली १९९७ मधील विनियम १४(४) (१) (जी), सन २०१७ च्या तत्कालीन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम १५.१० व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) विनियम क्र.३.११ मधील तरतूदीनुसार विकास योजना आराखड्यातील आरक्षणे

काही अटीसापेक्ष, स्थलांतरित करण्याचे अधिकार संबंधीत प्राधिकरणास आहेत. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने कार्यवाही केल्याचे दिसून येत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्राचा (नैना) अंतर्गत प्रकल्पांचा सिडकोच्या उदासिन धोरणामुळे विकासकामांना झालेला विलंब**

**(१८) ४४८२५ (२०-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्राचा (नैना) अंतर्गत प्रकल्पांचा सिडकोच्या उदासिन धोरणामुळे विकासकामांना विलंब होत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोच्या नियोजनशुन्य कारभारामुळे गेल्या पाच वर्षात नैना अंतर्गत विकासकामांचा २९२ प्रकल्पांपैकी ४२ प्रकल्पांनाच बांधकाम परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल तालुक्यातील नैना अंतर्गत २३ गावांचा स्मार्ट सिटी म्हणून उभारणाचा निर्धार केला असून सिडको प्रशासनाने एकही नोड विकसित केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नैना परिसरामध्ये बांधकाम परवानगी देण्याची जबाबदारी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असताना प्रत्येक महिन्याला १५ ते २० परवानग्या दिल्या जात असताना सिडकोवर जबाबदारी सोपविल्यापासून बांधकाम परवानगी मिळणे अवघड होऊ लागल्यामुळे बांधकाम व्यावसायिक हतबल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विमानतळ प्रभावित क्षेत्राचा विकास तातडीने करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) नैना अधिसूचीत क्षेत्रातील पनवेल तालुक्यातील २३ गावांचा अंतरीम विकास आराखड्याला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार राज्य शासनाने दि.२७.४.२०१७ रोजी मंजूरी दिली आहे.

सदर मंजूर विकास आराखड्याची अंमलबजावणी एकूण १० परियोजनांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यापैकी एका नगर रचना परियोजनेला शासनाची अंतिम मंजूरी प्राप्त असून त्यातील रस्त्याची कामे झालेली आहेत, तसेच नगर रचना परियोजना क्र.२ ला प्राथमिक मंजूरी मिळाली आहे तर परियोजना क्र.३ अंतिम टप्प्यात आहे.
(४) हे खरे नाही, सन २०१९ पासून ऑनलाईन बांधकाम परवानगी प्रणाली (NIAMS) अंतर्गत करण्यात येत असून त्यात आजवर एकूण ५५८ प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झाले आहेत. त्यापैकी २४४ प्रस्तावांना अंतिम मंजूरी मिळाली आहे. तसेच एकूण दाखल प्रकल्पापैकी इतके १७५ प्रस्ताव अर्जदारांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे सदर प्रस्ताव पूर्णत: बंद करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त ७० प्रकरणांवर आज रोजी कार्यवाही सुरु आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**(१९) ४४८३२ (१०-११-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरातील नागरिकांना पुरेसा दाबाने पाणी पुरवठा केला जात असल्याचा दावा मुंबई महानगरपालिकेने केला असला तरी प्रत्यक्षात मात्र झोपड्या, चाळी आणि इमारतींमधील पाणी आजही कमी दाबाने येत

असल्याने मुंबईत बहुतांश ठिकाणी मोटार लावून पाणी ओढले जात असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठयाच्या राष्ट्रीय प्रमाणकानुसार शहरातील रहात असलेल्या प्रत्येक व्यक्तीला १५० लिटर पाण्याची गरज असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आज मात्र मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये दर माणसी दररोज ४० लिटरपेक्षाही कमी पाणी पिण्यासह घरगुती वापरासाठी मिळत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील नागरिकांना पुरेशा दाबाने त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला पुरेल इतके पाणी पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०२-२०२३) :** (१) काही ठिकाणी पाण्याचा दाब कमी असल्यास मोटार लावून पाणी ओढले जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) राष्ट्रीय मानकानुसार मेगा सीटी व महानगरातील इमारतींमधील रहिवाश्यांना जलवाहिन्यांद्वारे पाणी पुरवठा होत असल्यास व मलनि:सारण व्यवस्था अस्तित्वात असल्यास पाणी पुरवठ्याचे प्रमाण दर माणसी दररोज १५० लीटर इतके आहे.

तसेच, राष्ट्रीय मानकानुसार महानगरातील झोपडपट्टीत उभ्या खांब जलजोडणीद्वारे ४० लीटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन या दराने पाणी पुरवठा करावयाचा आहे. तथापि, मुंबईतील झोपडपट्टीत ४५ लीटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन या दराने पाणी पुरवठा करण्यात येतो, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) मुंबईतील नागरिकांना पुरेशा दाबाने त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला पुरेल इतका पाणी पुरवठा करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना व कार्यवाही करण्यात येते:-
• अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्यांचे आकार विस्तार/सक्षमीकरण करणे.
• जुन्या व जीर्ण जलवाहिन्या बदलणे, नवीन जलवाहिन्या टाकणे - मागील तीन वर्षांत सुमारे ५०.७६ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.
• सेवा जलजोडण्यांचे नुतनीकरण करणे - मागील तीन वर्षांत सुमारे ५१,५२३ जलजोडण्यांचे नुतनीकरण केले आहे.
• सेवा जलजोडण्यांच्या जुडग्यांऐवजी एक सामाईक जलवाहिनी टाकणे - मागील तीन वर्षांत सुमारे ३०५ ठिकाणी जलजोडण्यांचे जुडगे काढून सामाईक जलवाहिनी तसेच स्टब मेन्स टाकण्यात आल्या आहेत.
• गळतीची ठिकाणे शोधून गळती तात्काळ बंद करणे – मागील तीन वर्षांत सुमारे १,०१,१५६ गळत्या दुरुस्ती करण्यात आल्या.
• उंचावरील झोपडपट्ट्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी भूमिगत शोषण टाकी व उदंचन व्यवस्था निर्माण करणे इ. कामे करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई सिडको हद्दीतील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत

**(२०) ४४९०२ (२५-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई सिडको हद्दीतील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत सिडको प्रशासनाने कोणतेही धोरण आखले नसल्यामुळे झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोच्या नियोजन शुन्य कारभारामुळे पंतप्रधान आवास योजनेच्या इमारती उभा राहील्या असल्या तरी झोपडपट्टीवासियांना घरे मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको हद्दीतील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत तातडीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) व (२) नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडकोची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सिडकोमार्फत नवीन क्षेत्रांचे नियोजन करण्यात येते. झोपडपट्टी पुनवर्सन हे सिडकोच्या अखत्यारित येत नाही.

तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन / नियोजन हे "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA)" यांच्या अखत्यारित येते.
(३) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांसाठी सोडतीव्दारे अर्ज करुन झोपडपट्टीधारक भाग घेऊ शकतात.

सिडकोमार्फत सदर योजनेतंर्गत २०२१ व २०२२ मध्ये अनुक्रमे उक्त पात्रधारकांसाठी अनुक्रमे ४४८८ व १७७३७ घरांची सोडत घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत

**(२१) ४५१३५ (२५-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतुक कोंडी होण्याचे प्रकार वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाच ते दहा तास वाहतुकीची कोंडी झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मार्गावरील वाहतूक कोंडीच्या वारंवार घडणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कोणत्या स्वरुपाची उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक ०३.०४.२०२२ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कोणत्याही प्रकारची वाहतूक कोंडी झालेली नाही.

तथापि, दिनांक ०५.०४.२०२२ रोजी कि.मी.३९.००० चे दरम्यान संबंधीत कंपनीमार्फत रस्त्याच्या कामाकरीता डोंगरकडा तोडण्याकरीता ब्लास्टींग करण्यात आले होते. सदर ब्लास्टींगमुळे मोठ-मोठे दगड व मातीचा मलबा रस्त्यावर आल्यामुळे द्रुतगती मार्गावरील पुणे-मुंबई व मुंबई-पुणे अशा दोन्ही लेन वाहतूकीस बंद झाल्या होत्या. ब्लास्टींगमुळे रस्त्यावर आलेले दगड व मातीचा मलबा बाजूला करुन वाहतूक सुरळीत करण्याकरीता साधारण १ तास ४२ मिनीटांचा कालावधी गेला. त्यामुळे द्रुतगती मार्गावर दोन्ही लेनवर वाहतूक कोंडी झाली होती.

तसेच, दिनांक ०८.०४.२०२२ रोजी दुपारी ०२.३० वा. मदत पोलीस केंद्र, बोरघाट चे हद्दीतील द्रुतगती मार्गालगत डोंगरकडा तोडण्याकरीता ब्लास्टींग करण्यात आले होते. सदर ब्लास्टींगमुळे मोठमोठे दगड मातीचा मलबा द्रुतगती मार्गावर आल्याने वाहतूक कोंडी झाली होती.
(३) सद्य:स्थितीत द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम सुरु असल्याने दिवसातून दोन वेळेला साधारणपणे २० मिनिटांकरीता ट्रॅफिक ब्लॉक राहील. तसेच, शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी ट्रॅफिक ब्लॉक असणार नाही. याची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेकडून मिळकत कराच्या रकमेमध्ये करण्यात आलेली वाढ

**(२२) ४५१३७ (२३-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेकडे नागरिकांकडून भरण्यात येणाऱ्या मिळकत कराच्या रकमेमध्ये माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रकमेमध्ये वाढ करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच अशाप्रकारे मिळकत कराच्या रकमेत एकूण किती टक्के वाढ करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदरहू कर वाढ करताना कोणत्या प्रकारचे सूत्र / निकष अवलंबले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीकरुन त्यानुसार वाढीव करांमधून पुणे महानगरपालिकेला एकूण किती ज्यादा रकमेचा महसूल मिळाला वा मिळण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील जाहिरातींच्या अनधिकृत फलकांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत

**(२३) ४५१३८ (२३-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील जाहिरातींच्या अनधिकृत फलकांवर आणि होर्डिंगवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्याची मोहीम मनपाच्या वतीने मार्च व एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधीत करण्यात आलेली कारवाई जप्त करण्यात आलेली मालमत्ता आणि वसूल करण्यात आलेला दंड याबाबींचा तपशील काय आहे,

(३) तसेच पुणे शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांचे व्यापक सर्वेक्षण करून त्यावर प्रभावी कारवाई करण्याबाबत काही ठोस योजना राबविण्याची योजना महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने प्रत्यक्ष कारवाई करुन पुणे शहर "अनधिकृत जाहिरात फलक मुक्त" करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २४४, २४५ व जाहिरात व फलक नियंत्रण नियम २००३ चे उल्लंघन करणारे/अनधिकृत फलकांवर क्षेत्रिय कार्यालयामार्फत निष्कासन कारवाई करण्यात आली आहे व ती नियमितपणे सुरु आहे.

(२) पुणे महानगरपालिकेकडून माहे मार्च व एप्रिल २०२२ या महिन्यामध्ये एकूण ३७५६८ अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, झेंडे इ. वर निष्कासन कारवाई केली होती. १४५० किलो ग्रॅम लोखंडी साहित्य जप्त करण्यात आले होते. निष्कासन कारवाई खर्चापोटी संबंधितांकडून रु. २,७७,०००/- दंड वसुल केला आहे.

(३) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीमधील सर्व जाहिरात फलकांचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. सदर सर्वेक्षणामध्ये आढळून येणाऱ्या विना परवाना जाहिरात फलकांना क्षेत्रिय कार्यालयामार्फत नोटीस बजावून ते नियमानुसार नियमित करण्यात येत आहेत अथवा नियमित न होणाऱ्या फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

(४) पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक निष्कासन करीता खाजगी संस्थेची नेमणूक केली आहे. सदर संस्थेकडून क्षेत्रिय कार्यालयांना निष्कासन कारवाई करीता मनुष्यबळ, साहित्य पुरविण्यात येत आहे. क्षेत्रिय कार्यालयाचे स्तरावर वेळोवेळी आढळून येणाऱ्या अनधिकृत फलकांवर कारवाई मोहिमेचे नियोजन करुन ते निष्कासित करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंदेवस्ती (ता.हडपसर, जिपुणे) येथील कचरा विलगीकरण केंद्रास लागलेल्या आगीबाबत**

**(२४) ४५१३९ (२३-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदेवाडी (ता.हडपसर, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रातील महापालिकेच्या कचरा विलगीकरण प्रकल्पाच्या केंद्रास दिनांक २२ मार्च २०२२ रोजी त्या सुमारास मोठी आग लागली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आग कशामुळे लागली आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने आपदग्रस्तांना मदत वा अर्थसहाय्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२३) :** (१) होय.
(२) शिंदेवस्ती येथील प्रकल्पाच्या शेजारी आग लागली असल्याने प्रकल्प सीमाच्या लगत असलेल्या उपउत्पदनाने पेट घेतला होता. अग्निशामक विभागामार्फत सदर आग त्वरीत आटोक्यात आणली होती.
(३) सदर आगीमुळे कोणतीही जिवितहानी झाली नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरासाठी समान पाणीपुरवठा योजनेचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(२५) ४५१४५ (२३-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरासाठी असलेल्या महत्त्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामागची कारणे काय आहेत तसेच दिनांक १० जून २०२२ अखेर उक्त योजनेच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, या योजनेवर १० जून २०२२ अखेर एकंदरीत किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,
(४) तसेच या योजनेचे काम पूर्ण करण्याकरीता किती निधीची आवश्यकता असून, सदरहू योजना प्रत्यक्षात कार्यन्वित होण्यास सुमारे किती कालावधी लागेल त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जागतिक महामारी कोविड तसेच विविध शासकीय विभागाच्या उदा. रेल्वे विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वाहतूक पोलीस विभाग, वन विभाग, पाटबंधारे विभाग, संरक्षण विभाग, इ. विभागामार्फत परवानगी मिळण्याच्या कार्यवाहीस वेळ लागत असल्याने प्रत्यक्ष कामास विलंब होत आहे. तसेच जलवाहिनी विकसित करण्याचे बहुतांशी काम हे शहरी भागातून असल्याने रस्ता खोदाई दरम्यान जमिनी खालील सेवावाहिन्यांचा (विद्युत वाहिन्या, गॅस वाहिन्या, मलवाहिन्या व इतर सेवावाहिन्या) अडथळा येत असल्याने, पाण्याचे मीटर बसविणेकामी नागरीकांचा होणारा विरोध

यामुळे काम करण्यास विलंब होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. ठेकेदार यांचे मार्फत देखील काही अंशी प्रत्यक्ष कामास विलंब होत असल्याकारणाने ठेकेदारांकडून आजरोजीपर्यंत रक्कम रु. ३.२४ कोटी इतका दंड आकारण्यात आला आहे. सद्यस्थितीमध्ये ४५% कामे पूर्ण झालेली असून प्रत्यक्ष काम सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) दिनांक १० जून, २०२२ अखेर सदर योजनेकरिता रु.८२९.१४ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे.
(४) या योजनेचे काम पूर्ण करण्याकरिता दिनांक १० जून, २०२२ अखेर झालेला खर्च वगळता १५४१.४२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून, सदरहू योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यास मार्च, २०२४ इतका कालावधी लागणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उरुळी देवाची आणि फुरसुंगी(ता. हवेली,जि.पुणे) येथील प्रस्तावित नगररचना योजनांच्या मंजूर आराखड्याबाबत**

**(२६) ४५१४७ (२३-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उरुळी देवाची आणि फुरसुंगी (ता.हवेली, जि.पुणे) येथील दोन नगररचना योजनांच्या (टाऊन प्लॅनिंग स्कीम) प्रारूप आराखड्यास पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने माहे फेब्रुवारी / मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावित योजनांच्या आराखड्यातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे तसेच या आराखड्यांच्या कक्षेतील एकूण हेक्टर क्षेत्र किती आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आराखड्यांच्या अंमलबजावणीबाबत पुढील कार्यवाहीची सध्यस्थिती काय असून प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिकेन मौजे उरुळी देवाची आणि फुरसुंगी (ता.हवेली, जि.पुणे) येथील बाह्यवळण रस्त्याच्या भूसंपादनासाठी नगर रचना योजना तयार करण्याचा इरादा जाहिर केलेला असून या योजनांच्या प्रारुप नगर रचना योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६१(१) अन्वये दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या महाराष्ट्रद शासन राजपत्र पुणे विभाग भाग - १ मध्ये प्रसिध्द केले आहे.
(२) पुणे महानगरपालिकेने अहवालात नमूद केल्यानुसार या नगर रचना योजनेतील भूखंडमालकांना ६०% क्षेत्रासह स्वतंत्र रस्ते व योग्य आकाराचे भूखंड उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच ४०% क्षेत्रामध्ये महापालिकेमार्फत किमान १२ मी. रुंदीचे रस्ते, बगिचे, क्रिंडागणे इ. सार्वजनिक सुविधा निर्माण केल्या जातील. उरुळी देवाची योजनेमध्ये सुमारे १८ एकर क्षेत्रामध्ये Urban Forest विकसित करण्याचे योजले आहे. उरुळी देवाची योजनेचे ११० हे. व फुरसुंगी योजनेचे २६१ हे. याप्रमाणे एकुण ३७१ हे. क्षेत्र या योजनांच्या कक्षेत आहेत.
(३) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६८(२) अन्वये प्रारुप नगर रचना योजनेस दिनांक ३०.०९.२०२२ रोजी मंजूरी दिलेली असून कलम ७२ (१) अन्वये, श्री. शि. गु. पाटील यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर योजनांचे लवादीय कामकाज पूर्ण होऊन नागरिकांच्या हरकती / सूचना व त्यांची सुनावणी झाल्यानंतर अंतिम अहवाल शासनास मंजूरीस्तव सादर करण्यात येईल. त्यास कलम ८६ अन्वये मंजूरीनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी करता येऊ शकेल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरा-भाईदर आदिवासी पाडयाच्या विकासाबाबत

**(२७) ४५३५३ (२१-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईदर परिसरात महाजन वाडी, माशाचा पाडा, काजू पाडा, मांडवी पाडा, मीनाक्षीनगर, दाचकुल पाडा, वरसावे, चेनागाव, केसरी पाडा, म्हसकर पाडा, बाबळीचा भाटपाडा, शेंडी पाडा, चेने पाटील पाडा, बेलकरी पाडा आणि शंभरी पराडा अशा एकूण १६ पाडयांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या मोठया संख्येने वास्तव्य असलेल्या या आदिवासी पाडयांमध्ये अद्यापही आदिवासी आश्रमशाळा, आदिवासी स्वयंरोजगार योजना आणि आदिवासी घरकुल योजना, शौचालय बांधणीसारख्या प्राथमिक उपक्रमांचाही अभाव असून, गेल्या दहा वर्षांपासून पालिकेने सातत्याने मागणी करुनही राज्य शासनाकडून आदिवासी पाडयांच्या विकासासाठी कोणत्याही स्वरुपाचा निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुमाफियांकडून सदर आदिवासी पाडयातील स्थानिक आदिवासींना दमदाटी करुन त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण केले जात असतानाही पालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाकडून कोणतीच कारवाई केली जात नसल्याची बाब दि. ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अतिक्रमण करणा-या भुमाफिया व त्यांना पाठीशी घालणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मीरा-भाइदर परिसरातील आदिवासी पाडयांच्या विकासाबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये चेना येथे अनाथ व बेघर ५० विद्यार्थ्यांसाठी सन २०१६ मध्ये निवासी वस्तीगृहे सुरू केलेली आहेत.

• मिरा-भाईंदर शहरामधील आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, शौचालय अंगणवाडी, गटारे, शाळा इ. मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यात येतात.

• मिरारोड (पूर्व) मिरागांव मुन्शी कंम्पाऊंड येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर यांच्यामार्फत आदिवासी वस्तीगृहाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(३) व (४)

• अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे.

• सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रभाग समिती कार्यालय क्र. ६, तसेच, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकामार्फत स्थळ पाहणी करून, सदर जागेवरील एकूण २२ पत्र्याच्या रूमचे अतिक्रमण केलेल्या बांधकामावर दि.०२.०५.२०२२ रोजी निष्कासनाची कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेने ३३५ एकरवर आयटी पार्क उभारण्याबाबत

**(२८) ४५४५९ (२७-०९-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्याकरीता नाशिक महानगरपालिकेने ३३५ एकरवर आयटी पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेवर प्रशासक नियुक्त झाल्यानंतर सदर आयटी पार्क रद्द करण्यात येणार आहेत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, नाशिक शहरातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी आयटी पार्क उभारण्याच्या प्रकल्पाला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
नाशिक महानगरपालिकेवर प्रशासक नियुक्त झाल्यानंतर सदर आयटी पार्क रद्द करण्यात आलेला नाही.
(३) सदर आयटी पार्क प्रकल्पाकरिता आवश्यक भूसंपादन व पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य नगरपंचायत व नगरपरिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या मागण्यांबाबत

**(२९) ४५५३४ (२७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगरपरिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्यावतीने शासन स्तरावर असलेले १०० टक्के वेतन अनुदान कोषागारामार्फत करणे, दहा-वीस-तीस पदोन्नती देणे, नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांच्या सफाई कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध यामध्ये समावेशन करणे व त्यांच्या पात्र वारसांना वारसा हक्क लागू करणे, नगरपरिषदेमधील सर्व पदे विनाशर्त समावेशन करणे इत्यादी विविध मागण्यांसदर्भात शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्मचारी संघटनेच्या मागण्यांबाबत लवकरात लवकर निर्णय झाला नाही तर दिनांक २ मे, २०२२ रोजीपासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा संघर्ष समितीच्यावतीने दिनांक १० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदनाव्दारे देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगरपरिषद कर्मचारी संघटनेच्या अनुज्ञेय मागण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी शहरात नवीन अग्निशमन केंद्र निर्मिती करण्याबाबत

**(३०) ४५५५७ (२८-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एक लाख लोकसंख्येमागे एक अग्निशमन केंद्र असणे शासनाच्या नियमानुसार अपेक्षित असून परभणी शहराची लोकसंख्या जवळपास साडेतीन लाख असतांनाही एकाच अग्निशमन केंद्रावर गेल्या अनेक वर्षापासून संपूर्ण शहराचा भार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च, २०२२ या कालावधीत शहरात जवळपास ४० आगीच्या घटना घडल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर केंद्राकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने अनेकदा आगीच्या व इतर लहान-मोठ्या घटना घडल्यास मोठी अडचण निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी शहरात नवीन अग्निशमन केंद्र निर्मिती करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :**(१) होय खरे आहे.
(२) सदर कालावधीत शहरामध्ये आगीच्या लहानमोठ्या सुमारे ४० घटना घडलेल्या आहेत.
(३) आगीच्या घटना घडल्या त्या नियंत्रणात आणता आल्यात यासाठी बाह्य प्रणालीमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे.
(४) परभणी शहराकरिता नवीन अग्निशमन केंद्र बांधकाम करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यतेनंतर दिनांक ४.११.२०२२ पत्रान्वये प्रस्ताव अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे मंजुरी व निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाहीत.

---

### परभणी शहरातील सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावर डांबरीकरण करुन निधीचा अपव्यय केल्याबाबत

**(३१) ४५५८१ (२८-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील मजूबत आणि अनेक वर्षापासून चांगल्या स्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावर महानगरपालिका प्रशासनाने डांबरीकरण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी शहरातील अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झालेली असतांना सदर रस्ते दुरुस्तीकडे दुर्लक्ष करुन दर्जेदार रस्त्यावर डांबरीकरणाचा कोट टाकण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :**(१)व (२) हे खरे नाही.
परभणी शहरातील चांगल्या स्थितीतील सिमेंट रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले नाही. तथापि, ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेले एकूण ३ सिमेंट रोड ना-दुरुस्त झाल्याने सुमारे २.५० कि.मी. रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले असल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) व (४) प्रश्न उध्दभवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चारा छावण्यांची देयके जिल्हा प्रशासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(३२) ४५७५९ (१४-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील सन २०१९ मध्ये चालविलेल्या चारा छावण्यांची ३८ कोटींची देयके जिल्हा प्रशासनाकडे प्रलंबित असल्याचे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखापरिक्षणाला दोन महिने होऊन देखील जिल्हा प्रशासनाच्या दिरगांईमुळे शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव अद्यापही सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन वर्षे उलटले तरी देखील चारा छावणीची देयके न मिळाल्याने बँका, खाजगी कर्जे यांचे देणे न दिलेल्यामुळे छावणी चालक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तातडीने चारा छावण्यांची थकीत देयके काढण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील चारा छावण्या करिता दि.१०.०६.२०२१ चे पत्रान्वये ३८,३४,०५,९५२/- (अक्षरी रक्कम रुपये अडतीस कोटी चौतिस लाख पाच हजार नऊसे बावन्न फक्त) एवढया अनुदानाची मागणी बाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर केलेला होता.
तथापि हे प्रस्ताव पात्र असल्याचे सिद्ध होत नसल्याने शासनाने त्रुटी पुर्ततेसाठी सदर प्रस्ताव परत पाठविला आहे.
(२) हे, खरे नाही.

शासनाने काढलेल्या त्रुटीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी दि.२०.१२.२०२१ रोजी आदेश काढून जिल्हास्तरीय तपासणी पथक नेमून चारा छावणीतील लेखाविषयक बाबींची तपासणी करणेत आली. मार्च २०२२ अखेर सर्व छावण्यांचे अहवाल प्राप्त झालेले आहेत.

चारा छावण्यातील जनावरांची Cattle Camp Management System मध्ये नोंद असणे अनिवार्य असल्याने, याबाबीची काही छावण्यांकडून पुर्तता होत नसल्याने अनुदान मागणी करणेस विलंब झाला.

तपासणी पथकाचे अहवालासह जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा दि.१३.७.२०२२ रोजीचा प्रस्ताव शासनास विभागीय आय़ुक्त यांच्यामार्फत दि.१.८.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.
(३) हे, खरे नाही

यापूर्वीची पात्र व देय रकमेची सर्व देयके छावणी चालकांना वेळोवेळी शासनाकडून अदा करणेत आलेली आहे.
(४) दि.६.९.२०२२ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सोलापूर जिल्ह्यातील चारा छावण्यांच्या प्रलंबित देयकाबाबत विभागीय आय़ुक्त, पुणे यांच्याकडून प्राप्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये प्रस्तुत विषयावर सांगोपांग चर्चा झाली. चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दि.३.१०.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच, सदर प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे.

---

**माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(३३) ४५७९५ (२५-०९-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री. अजय अंबेकर यांच्यावर फौजदारी आणि आर्थिक अनियमिताबाबत गुन्हे दाखल करुन त्यांच्यासह इस्त्रायल दौऱ्यांवर गेलेल्या अन्य ४ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करुन कारवाई करण्याबाबत दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा. गृहमंत्री महोदयांना विधानसभा लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार याप्रकरणांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे, व त्यानुषंगाने दोषी असलेल्या तत्कालीन संचालक श्री.अजय अंबेकर व बेकायदेशीर इस्त्रायल दौऱ्यावर गेलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२३) :** (१) होय,

(२) माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री. अजय अंबेकर यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९, नियम ८ खाली विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) चौकशीअंती निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**अतिवृष्टीमध्ये नांदिवली ते किंजळेतर्फ (जि.रत्नागिरी, ता.खेड) खेड नदीवरील साकव नादुरस्त असल्याबाबत.**

**(३४) ४५८४२ (२५-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात सन २०२१ मध्ये अतिवृष्टीमध्ये नांदिवली ते किंजळेतर्फ खेड नदीवरील साकव, खालची हुंबरी येथील साकव नादुरस्त झाल्याने या मार्गावरील वाहतूक मागील अनेक दिवसापासून बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील साकव नादुरस्त असल्याने तेथील आबालवृध्दांना तसेच रुग्णांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,खेड तालुक्यातील अन्य साकवही मोठया प्रमाणात नादुरुस्त असल्याने पावसाळयात नागरिकांना रहदारीकरिता धोकादायक आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरील साकवाची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. प्रवासासाठी पर्यायी रस्त्याचा वापर करावा लागत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन साकव हा योजनाबाहय रस्त्यावरील आहे. यास्तव सदर साकवाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात येऊन, जिल्हा नियोजन समितीकडील निधी उपलब्धतेच्या अधीन राहून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत साकव दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**लामजना ( ता.औसा,जि.लातूर) येथील नवीन इमारतीत नियोजित शाळा व वसतिगृह सुरू करणेबाबत**

**(३५) ४५९१० (२३-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लामजना (ता.औसा, जि.लातूर) येथील सामाजिक न्याय विभागाचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्ष झाली असून लाखो रुपये खर्च करून अद्याप तेथे नियोजित शाळा व वसतिगृह सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, याबाबत नवीन इमारतीत नियोजित शाळा व वसतिगृह सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार (जि.बुलढाणा) येथील नगरपालिका व पंचायत समितीच्या रिक्त पदांबाबत**

**(३६) ४५९४५ (२५-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार नगरपालिकेतील (जि.बुलढाणा) मुख्याधिकारी व पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१), (२) व (३) दि. ०५.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये मुख्याधिकारी, लोणार नगरपरिषद हे पद भरण्यात आले होते. परंतू, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी सदर नियुक्ती आदेश रद्द केलेले आहे. त्यानुषंगाने सदरपद तातडीने भरण्याची कार्यवाही नव्याने करण्यात येईल.
तसेच, दि.१३.१०.२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये गट विकास अधिकाऱ्याचे पद भरण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर येथे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३७) ४६०१६ (०९-१०-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अतिवृष्टीची ५० हजार रुपये देण्याचे आश्वासन शासनाने देऊन ही दक्षिण सोलापूर येथील शेतकऱ्यांना न मिळाल्याने तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला असल्याची बाब माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंद्रुप अप्पर तहसिल कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चात केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथे मोर्चा काढण्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) जून ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीतील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी, जीरायत क्षेत्राकरिता रू.१०,०००/-, बागायत क्षेत्राकरिता रू.१५,०००/- व बहुवार्षिक पिकांकरिता रू.२५,०००/- प्रति हेक्टर या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीपेक्षा जास्त दराने मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. माहे फेब्रुवारी-मे, २०२१ या कालावधीत अवकाळी पावसामुळे सोलापूर जिल्हयामध्ये झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१८.०२.२०२१ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने रू.१७६.९५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तर माहे ऑगस्ट-सप्टेंबर,२०२१ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.२७.१०.२०२१ अन्वये सोलापूर जिल्हयाकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वाढीव दराने रू.६०२२.०६ लक्ष व शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१६.०२.२०२२ अन्वये रू.२००७.३६ लक्ष असे एकूण रू.८०२९.४२ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिका निवडणुकीचा निवडणूक आयोगाकडे पाठविलेला प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा सामाजिक माध्यमामध्ये प्रसारित झाल्याबाबत**

**(३८) ४६०६१ (२७-०९-२०२२). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाकडे पाठविलेला प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा निवडणूक आयोगाकडे सादर करण्यापूर्वीच सोशल मीडीयावर व्हायरल झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा सोशल मीडीयावर व्हायरल करणाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे, प्रभाग रचनेच्या प्रस्तावास दिनांक २७.५.२०२ रोजी राज्य निवडणूक आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिनांक २८.५.२०२२ रोजी विना स्वाक्षरीत अनाधिकृत निवडणुक विभागामार्फत सीमा व व्याप्ती अंतिम करत असताना केलेल्या कामाची कच्ची प्रत सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याचे निदर्शनास आले.

(२) व (३) हे खरे आहे.

महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या चौकशीनुसार श्री.काझी इम्तीयाज सोहेल या कर्मचाऱ्याने सदर माहिती संगणकातुन अनाधिकृतपणे व्हायरल केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित दोषी कर्मचाऱ्याविरोधात पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ३०.५.२०२२ रोजी गु.र.नं. १५८/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील आंतरजातीय विवाहीत जोडपी प्रोत्साहन अनुदानापासुन वंचित असल्याबाबत.**

**(३९) ४६०७९ (०६-१०-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून आंतरजातीय विवाह केलेल्या ८ जोडप्यांना जिल्हा परिषदेकडे पुरेशा प्रमाणात निधी नसल्याने प्रोत्साहन अनुदान न मिळाल्याने वंचित असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये ही आंतरजातीय विवाह करणारी अनेक प्रकरणे निधी अभावी प्रलंबित असतानाही त्यांना जिल्हा परिषदांकडून तात्काळ निधी न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी असणारा निधी वेळेत खर्च होत नसल्याने सदर निधी परत जात असल्याने अनेक गरीब गरजू लोकांसाठी असणाऱ्या योजना केवळ कागदावर न राहत सक्षम पणे चालविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :**(१) अंशतः खरे आहे

(२) सदर योजना ही केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्र हिस्सा ५०% व राज्य हिस्सा ५०% प्राप्त होणे आवश्यक आहे.

यास्तव सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील केंद्र हिस्सा ५०% मिळविण्याकरिता केंद्र शासनास पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदर केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यावर आंतरजातीय विवाह योजनेंअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात येतील
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**पालघर जिल्ह्यात नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(४०) ४६२८४ (२५-०९-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात पालघर, वाडा, जव्हार, डहाणू या चार नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाच्या ४ जागा रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील ४ महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे शहरातील रस्ते, कचरा व्यवस्थापन, दिवाबत्ती, पाणी-पुरवठा, आरोग्यविषयक समस्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरीकांना मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर जिल्ह्यातील चार महत्त्वाची पदे भरण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) पालघर जिल्ह्यातील एकुण सात नगरपरिषदा/नगरपंचायतीपैकी केवळ वाडा येथील मुख्याधिकारी पद रिक्त असून, उर्वरीत सहा पदांवर मुख्याधिकारी कार्यरत आहेत.
(२) नाही.
(३) जिल्ह्यातील सात नगरपरिषदांपैकी केवळ एक पद रिक्त असून, त्या रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार अन्य अधिकारी यांचेकडे सोपवून नियमित कामकाज पार पाडण्यात येत आहे. सबब या प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या कामामध्ये कार्यकारी अधिकारी यांच्या संगनमताने झालेला गैरव्यवहार**

**(४१) ४६२८७ (२८-०९-२०२२).श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर(नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई),श्री.विनोद निकोले (डहाणू) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या कामामध्ये 'विजय इन्फ्रा' या कंपनीसोबत स्मार्ट सिटीचे कार्यकारी अधिकारी यांनी संगनमताने सुमारे ११ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची लेखी तक्रार सोलापूर जिल्ह्यातील राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांने दिनांक ३१ मे, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री तसेच नगरविकास मंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२३) :** (१) केंद्र पुरस्कृत स्मार्ट अभियानांतर्गत सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत विजय इन्फ्रा या कंपनीमार्फत करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री कार्यालयास निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) (३) व (४) सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत विजय इन्फ्रा या कंपनीमार्फत करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने शासनास सादर करण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांना सदर प्रकरणी चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## हडपसर (जि.पुणे) उड्डाणपूलावरील जड वाहतूक सुरु करण्याबाबत

**(४२) ४६३६३ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) पुलावरील महापालिकेने लावलेल्या हाईट बॅरिकेडला वाहने धडकून अपघाताचे प्रमाण वाढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील स्थानिक नागरीकांनी अपघात होऊ नये यासाठी स्वखर्चाने उड्डाणपुलावरील तुटलेले व लटकलेले बॅरिकेड्स जेसीबीने काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासन याकडे लक्ष देत नसून जड वाहनांसाठी उड्डाणपुल २ महीने उलटूनही अद्यापही उड्डाणपूल सुरु केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हडपसर येथील तुटलेले बॅरिकेडस काढण्याबाबत तसेच जड वाहनांकरीता उड्डाणपूल सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेतील कर्मचारी व अधिकारी यांच्यावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पुलाचे बहुतांशी दुरुस्तीची कामे दि.१०/०४/२०२२ रोजी पूर्ण झाल्यानंतर सदर पुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी नेमण्यात आलेले तज्ञ सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार हा पूल तात्पुरता हलक्या वाहनांसाठी सुरु करुन दिनांक ३१/०५/२०२२ पासून सर्व प्रकारच्या वाहनांसाठी सुरु करण्यात आला. दरम्यानच्या काळात जड वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पुलाच्या सुरुवातीस हाईट बॅरिकेड उभारण्यात आले होते. रात्रीच्या वेळेस वाहन चाकलांनी हाईट बॅरिकेड बसविल्याबाबतच्या सूचना, साईनबोर्ड, ब्लिंकर व स्पीडब्रेकर याकडे दुर्लक्ष करुन वाहने पुलावरुन चालविल्याने हाईट बॅरिकेड तुटणे/नादुरुस्त होण्याच्या काही घटना झालेल्या आहेत. परंतु पोलीस विभागाकडे या कालावधीमध्ये अपघात घडल्याची कोणतीही नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

वाहनांच्या धडकण्याने तुटलेले/नादुरुस्त झालेले हाईट बॅरिकेट पुणे महानगरपालिकेमार्फतच काढण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही.

सदरच्या पुलाच्या दुरुस्तीची सर्व कामे पूर्ण झाली असून सदरचा पूल दिनांक १०/०४/२०२२ पासून हलक्या वाहनांसाठी व दिनांक ३१/०५/२०२२ पासून सर्व (हलक्या व जड) वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे.

(४) सदरच्या पुलावरील बसविण्यात आलेले हाईट बॅरिकेड हे पुणे महानगरपालिकेमार्फत ३० मे २०२२ रोजी काढण्यात आले असून त्यानंतर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूल खुला करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याबाबत

**(४३) ४६३६६ (२५-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या आणी त्यांच्यामुळे होणारा उपद्रव साततत्याने वाढत असल्याचे निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कुत्र्यांच्या नसबंदीकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत असून, गेल्या नऊ महिन्यात पालिकेने केवळ १२% भटक्या कुत्र्यांचीच नसबंदी केली असल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भटक्या कुत्र्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन कुत्र्यांची नसबंदी करण्याचे काम देणाऱ्या संस्थेवर व महापालिका कर्मचारी यांच्यावर कामात दुर्लक्ष केल्याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडील कुत्रा बंदोबस्त विभागाचे कामकाज आरोग्य कार्यालय येथून नियंत्रित होत असते. सदरचे काम ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग) रुल्स २००१ या नुसार केले जाते. भटकी व मोकाट कुत्री पकडून त्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करुन पुन्हा त्याच ठिकाणी ५ दिवसांनी सोडली जातात. पुणे महानगरपालिकेकडे नसबंदी शस्त्रक्रियेसाठी डॉ. नायडू हॉस्पिटल आवारातील डॉग पॉन्ड, बाणेर मोहन नगर तसेच मुंढवा केशवनगर येथील डॉग पॉन्ड असे तीन डॉग पॉन्ड उपलब्ध आहेत. सदर दोन डॉग पॉन्ड मध्ये CANINE CONTROL AND CARE या संस्थेमार्फत मोफत नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यात येत आहे. तसेच अन्य एका खाजगी संस्थेकडील उपलब्ध असलेले डॉग पॉन्डचा उपयोग भटकी व मोकाट कुत्री पकडून त्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यात येत आहे.

तसेच या व्यतिरिक्त स्थायी समिती ठराव क्र.२२९९, दि.१६/२/२०२२ अन्वये नवीन तीन संस्थांना पुणे महानगरपालिका तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांच्या हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.

| अ.क्र | सन | नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण केलेली संख्या | लसीकरण मोहीम अंतर्गत केलेली संख्या |
|---|---|---|---|
| १. | २०१९-२०२० | १९६३० | -- |
| २. | २०२०-२०२१ | १४१३७ | १४५५ |
| ३. | २०२१-२०२२ | १३१४८ | ६१५५ |
| ४. | २०२२-२०२३ (माहे जुलै २०२२ अखेर) | ८१२९ | २९०० |
| | एकूण | ५५०४४ | १०५१० |

(३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेकडे भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या ऑनलाईन तक्रार प्रणालीद्वारे तसेच आरोग्य खात्याकडे दूरध्वनीद्वारे नागरीकांकडून तक्रारी येत असून सदर तक्रारींचे निवारण करण्यासाठी महानगरपालिकेच्या कुत्रा बंदोबस्त विभागाकडील परिमंडळ १ ते ५ मध्ये अस्तित्वात असलेल्या पाच गाड्यांमार्फत भटकी व मोकाट कुत्री पकडून त्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करुन पुन्हा त्याच ठिकाणी ५ दिवसांनी सोडली जातात. अशाप्रकारे तक्रारींचे निवारण करण्यात येते. त्याचप्रमाणे खाजगी दोन संस्थांमार्फत नागरीकांमधील भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी भटक्या व मोकाट श्वानांना लसीकरणाची मोहिम सतत राबविण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे-नगर महामार्गावरील येरवडा पर्णकुटी ते खराडी आपले घर सोसायटी दरम्यान सर्व्हिस रस्ता करण्याबाबत

**(४४) ४६३६८ (२५-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नगर महामार्गावरील येरवडा पर्णकुटी ते खराडी आपले घर सोसायटी दरम्यान सहा पदरी रस्ता करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर बीआरटी करताना रस्त्याच्या बाजूला सर्विस रोड करण्याचे नियोजन असताना महापालिकेने रस्ता पूर्ण झाला तरी सर्विस रस्ता केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्विस रस्ता न झाल्यामुळे नागरिकांना रस्ता ओलांडताना खूप त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियोजित असतांना सर्विस रस्ता न करणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रामवाडी भुयारी मार्गालगत नगर रस्ता ते कल्याणीनगर, चंदननगर चौक ते केंद्रीय विद्यालय चौक व खराडी बायपास चौक ते आपलेघर अशा तीन ठिकाणी सर्व्हिस रस्ता करण्यात आलेला आहे. सर्व्हिस रस्त्याकरिता आवश्यक जागेचे भूसंपादन पुर्ण झाल्यानंतर नियोजनाप्रमाणे बाकी सर्व्हिस रस्ता करण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

नागरीकांना पुणे नगर रस्ता ओलांडण्याकरिता चौकामध्ये सिग्नल व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच झेब्रा पट्टे आखणी व रेज्ड पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, कॅटस् आय, बोलार्ड इ. आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडगावशेरी (जि.पुणे) येरवडा येथील मुळा-मुठा नदीपात्रात बांधकाम प्रकल्पाचा राडारोडा टाकल्याबाबत

**(४५) ४६३७४ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगावशेरी (जि.पुणे) येरवडा भागातील सादलबाबा दर्ग्याच्या मागील बाजूस मुळा मुठा नदीच्या पात्रात एका बांधकाम प्रकल्पाच्या खोदकामाचा राडारोडा टाकण्यात आला असल्या मुळे मुळा-मुठा नदी पात्रातील पाणी दुषित होत असून पर्यावरण प्रदुषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने वा महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

या ठिकाणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत जीओ टेक्निकल सर्व्हे करणे व टो वॉल करणे इ. कामांसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे कॉफर डॅमचे काम सुरु आहे. जीओ टेक्निकल सर्व्हे व टो वॉलचे काम पूर्ण झाल्यानंतर नदीपात्रात करण्यात आलेले तात्पुरत्या स्वरुपाचे काम काढून घेण्यात येणार आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगावशेरी (जि.पुणे) येरवडा येथील स्वच्छता गृहांची झालेली दुरवस्था**

**(४६) ४६३७७ (२५-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या नगररोड वडगावशेरी क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत येत असलेल्या भागामध्ये स्वच्छतागृहात पाणी पुरवठा होत नसल्याने सदरील स्वच्छतागृहांमध्ये घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे नागरीकांची विशेषतः महिला वर्गाची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत असून परिसरात दुर्गंधी पसरून वातावरण प्रदुषित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) पुणे महानगरपालिकेतर्फे मशीनद्वारे सर्व स्वच्छता गृहांची दैनंदिन स्वच्छता केली जाते. सार्वजनिक स्वच्छता गृहांमध्ये नळ कनेक्शन जोडण्यात आले असून पाणी पुरवठा वेळेप्रमाणे सोडण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात आंतरजातीय विवाहाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ४६६७६ (०६-१०-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात सन २०१९ पासून ते अद्यापपर्यंत आंतरजातीय विवाहाच्या अनुदानाचे प्रस्ताव देणाऱ्या ६३८ लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनुदानाकरिता लाभार्थींकडून संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लाभार्थ्यांना अनुदान तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

---

**मुंबईतील मुंबई म्हाडा मंडळानी बांधलेले सार्वजनिक शौचालय देखभाली करिता महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(४८) ४६७३६ (२२-०७-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून म्हाडा मंडळानी बांधलेले शेकडो सार्वजनिक शौचालय अद्याप ही मुंबई महानगरपालिकेने देखभाली करिता हस्तांतरीत केले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभागनिहाय किती शौचालय हस्तांतरित करण्यात आली नाहीत व त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच मुलुंड विभागात सुद्धा अनेक शौचालयांची देखभाल होत नसल्याने त्यांची दुरवस्था झालेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ही सर्व शौचालयाचे देखभाल करण्याकरीता महानगरपालिका वा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०२-२०२३) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे हस्तांतरण धोरण निश्चित न झाल्याने म्हाडाने बांधलेली ३९८१ शौचालये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत करुन घेण्यात आलेली नाहीत.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "टी" विभागातील शौचालयांची म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील हस्तांतरण प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नसतांनाही सदर शौचालयांची साफसफाई बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

मुलुंड विभागामध्ये संभाजी नगर येथील म्हाडाची २ शौचालये मोडकळीस आलेली असून ती वापरात नाहीत. सदर ठिकाणी स्थानिक नागरिकांच्या सुविधेकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लॉट-१० अंतर्गत शौचालय बांधण्यात आलेले आहे. बहुतांश ठिकाणी दत्तक वस्ती योजनेच्या सहकार्याने केलेल्या साफसफाई बाबतची देखरेख बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

तसेच, सदर परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मलनि:सारण वाहिनी / शौचालयाची तक्रार सापेक्ष सफाई करण्यात येते.
(४) सदर प्रकरणी म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी यांचेसमवेत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात दिनांक १९.०९.२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत:-
• जी शौचालये नादुरुस्त अवस्थेत आहेत ती त्वरीत हस्तांतरीत करुन पुनर्बांधणीसाठी प्रस्तावित करण्याबाबत महानगरपालिका अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत.
• म्हाडाने बांधलेल्या उर्वरित शौचालयांचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, सदर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर शौचालयांची देखभाल म्हाडामार्फत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरामध्ये नवीन घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत

**(४९) ४६७५२ (१०-११-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंबर्डे, कल्याण (जि.ठाणे) येथील घनकचरा प्रकल्पाच्या जागेवर कचऱ्याचे ढीग साचले असून त्यावर कोणतीही प्रक्रिया न केल्याने परिसरातील नागरिकांच्या जीवितास व आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याची बाब दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भागातील घनकचरा प्रकल्पाच्या गाड्यांमधून रस्त्यावर पडणाऱ्या कचरा व घाण यामुळे अपघाताचे देखील प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कल्याण-डोंबिवली महापालिकाअंतर्गत नवीन घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

उंबर्डे प्रकल्पाच्या प्रिसार्ट युनिटमध्ये दिनांक १५ मे, २०२२ ते दिनांक १७ मे, २०२२ दरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे कचरा प्रक्रिया कमी गतीने सुरू होती. त्यामुळे कचऱ्याच्या क्षमतेत वाढ झाली होती. तथापी, दिनांक १८ मे, २०२२ रोजी प्रकल्प पुन:श्च सुरू करून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आहे.

तसेच, उंबर्डे प्रकल्पास येणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करण्यात येत असून नागरिकांच्या जीवितास वा आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण डोबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

वाहून नेला जाणारा कचरा रस्त्यावर पडणार नाही याची दक्षता घेवून कचऱ्याची वाहतूक व्यवस्थितरित्या झाकूनच करण्यात येत आहे.

तसेच यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले नाही असे देखिल आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) डोबिवली (प) आ.क्र.२३२ येथे १०० मे. टन प्रति दिन क्षमतेचा घनकचरा प्रकल्प उभारणेची निविदा मंजूर झाली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील मामा तलावातील गाळ काढण्याबाबत**

**(५०) ४६८०३ (०९-१०-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिध्द असलेल्या गोंदिया जिल्हयातील जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागांची नोंदणी १७४८ मामा तलावांपैकी गाळ काढण्यात आलेला नसल्याने ३२७ तलावांचे सपाटीकरण झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मामा तलावातील गाळ काढण्यात आलेला नसल्याने जिल्हयातील तलावातील पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने कृषी सिंचन क्षेत्रावर याचा विपरीत परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर मामा तलावातील गाळ त्वरीत काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही,

तलावांचे सपाटीकरण झालेले नाही. भंडारा जिल्ह्यातून गोंदिया जिल्हा स्वतंत्र झाल्यानंतर १७४८ मामा तलावांची यादी जि.प. ला देण्यात आली होती. त्यापैकी तपासणींती १४२१ मामा तलाव आढळून आले आहेत. उर्वरित ३२७ मामा तलावांचा शोध घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांची पुनर्बांधणी व बळकटीकरण या कार्यक्रमांतर्गत मामा तलावांची दुरुस्ती करुन मूळ सिंचन क्षमता पुनर्स्थापना करण्याचे काम मोहीमेच्या स्वरुपात घेऊन पूर्ण करण्याचा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत नियोजित आराखड्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील एकूण ५५२ तलावातील गाळ काढण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.